# ● जिल्हाधिकारी उस्मानाबाद, ठाणे, गोंदिया, सिंधुदुर्ग तलाठी भरती लेखी परीक्षा-२०१४

**प्र.१. एकांकिकाकार नसलेल्या लेखकाचे नाव ओळखा.**

(१) अनंत काणेकर (२) वसंत बापट (३) विजय तेंडुलकर (४) महेश एलकुंचवार

**प्र.२. संस्कृत नसलेला उपसर्ग ओळखा.**

(१) आड (२) प्रति (३) अभि (४) उप

**प्र.३. 'लघुत्तरी' या संधीचा योग्य विग्रह ओळखा.**

(१) लघु + उत्तरी (२) लघू + उत्तरी (३) लघु + ऊत्तरी (४) लघू + ऊत्तरी

**प्र.४. योग्यप्रकारे केलेले सामान्यरूप ओळखा.**

(१) निकाल - निंकाली (२) स्वार - स्वारी

(३) वासरू - वासर (४) कोकरू - कोकरा

**प्र.५. समानार्थी नसलेला शब्द ओळखा.**

(१) घोडा (२) अश्व (३) तुरग (४) जल्द

**प्र.६. 'भारतीय नागरीकांना भारताविषयी पूज्यभावना आहेत.' वाक्य लेखननियमांनुसार होण्यासाठी त्यात कोणता बदल करावयास हवा?**

(१) भारतीय - भारतिय (२) नागरीकांना - नागरिकांना

(३) भारताविषयी - भार्ताविषयी (४) पूज्य - पुज्य

**प्र.७. दिक् + अंतर या दोन पदांचा योग्य संधी ओळखा.**

(१) दिकंतर (२) दिगंतर (३) दिक्यंतर (४) दिकुंतर

**प्र.८. मराठी प्रत्यय ओळखा.**

(१) तव्य (२) आई (३) अनीय (४) ला

**प्र.९. संयुक्त नसलेले वाक्य ओळखा.**

(१) तुझी भीती गेल्याशिवाय तुला वाहन चालवता येणार नाही.

(२) तुझा भित्रेपणा सोड, मग तुला वाहन चालवता येईल.

(३) तू धाडस कर आणि वाहन चालवायला शीक.

(४) तू धाडसी आहेस, तुला सहज वाहन चालवता येईल.

**प्र.१०. कर्तरी प्रयोगाचे वाक्य ओळखा.**

(१) मी नक्की दिल्लीहून लग्नाला येईन. (२) माझे येणे त्याने गृहीत धरले.

(३) त्याने मला आग्रहाचे निमंत्रण पाठवले. (४) मला त्याच्या आग्रहाला मान द्यावा लागला.

**प्र.११. तद्‌भव नसलेला शब्द ओळखा.**

(१) सूक्त (२) हिरा (३) घर (४) बहीण

**प्र.१२. पुढीलपैकी कोणते नाव कथेचे नाही?**

(१) किडलेली माणसे (२) सतरावे वर्ष (३) सुलतान (४) सती

**प्र.१३. कर्मणी प्रयोगाचे वाक्य ओळखा.**

(१) रावणपुत्र इंद्रजिताने हनुमानाला अस्त्रसामर्थ्याने बद्ध केले.

(२) तुलसीदासांनी तुलसीरामायण हे काव्य लिहिले.

(३) सीतेभोवती राक्षशिणी पहारा करीत होत्या.

(४) मारीच राक्षस सुवर्णमुगाचे रूप घेऊन आला.

**प्र.१४. पुढीलपैकी कोणते वाक्य भूतकाळात नाही?**

(१) मी गावाला जाणार होतो. (२) मी गावाला गेलो होतो.

(३) मला गावाला जायचे होते. (४) मला गावाला जायचेय.

**प्र.१५. प्रत्ययघटित नसलेला शब्द ओळखा.**

(१) दळण (२) कांडण (३) कारण (४) शिंपण

**प्र.१६. 'नाकी नऊ येणे.' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.**

(१) नवाचा पाढा पाठ असणे. (२) नवाचा पाढा पाठ नसणे.

(३) नाकाचा शेंडा लाल होणे. (४) बेजार होणे.

**प्र.१७. पुढीलपैकी कोणते नाव काव्यसंग्रहाचे आहे?**

(१) शेला (२) अमृतवेल (३) अनंतिका (४) रक्तपुष्प

**प्र.१८. आज्ञार्थी नसलेले वाक्य ओळखा.**

(१) रांगेत उभे रहा. (२) रांग मोडू नका.

(३) रांग लावली पाहिजे. (४) रांग सरळ लावा.

**प्र.१९. केवल वाक्य ओळखा.**

(१) अति गर्व करेल त्याचे भले होणार नाही. (२) अति गर्व करणाऱ्याला पश्चात्ताप होणार.

(३) अतिशहाणा त्याचा बैल रिकामा. (४) अति गर्विष्ठपणा करा आणि मातीला मिळा.

**प्र.२०. भविष्यकाळाचे वाक्य ओळखा.**

(१) मी पास झालो. (२) मी पास झालो होतो.

(३) मी पास झालो असेन. (४) मी पास झालो आहे.

**प्र.२१. अयोग्य प्रकारे केलेले सामान्य रूप ओळखा.**

(१) रंग – रंगा (२) रूप – रूपे (३) पोत – पोता (४) मूर्ती – मूर्ती

**प्र.२२. पुढील नावामधून नाटकाचे नाव ओळखा.**

(१) ताम्रपट (२) राघववेळ (३) संहिता (४) पाणिग्रहण

**प्र.२३. विरुद्धार्थी नसलेली जोडी ओळखा.**

(१) सुरूप X कुरूप (२) सकारण X अकारण (३) शीतल X दाहक (४) दोष X सदोष

**प्र.२४. विधानार्थी वाक्य ओळखा.**

(१) असे कोणीही समजू नये. (२) असे कोणाकोणाला वाटते.

(३) काय हा गैरसमज. (४) समजून घ्यायला नको का.

**प्र.२५. पुल्लिंगी जोडी ओळखा.**

(१) बैल – गोऱ्हा (२) मांजरी – बोका (३) शेळी – बोकड (४) गाय – म्हैस

**प्र.२६. तत्सम शब्द ओळखा.**

(१) दूध (२) कलश (३) गाव (४) कोवळा

**प्र.२७. स्त्रीलिंगी शब्द ओळखा.**

(१) सांत्वन (२) पुढाकार (३) रीत (४) वैभव

**प्र.२८. 'धोक्याची कामे करायला कोणी पुढे येत नाही.' – या अर्थाची म्हण ओळखा.**

(१) दुरून डोंगर साजरे.

(२) टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपण येत नाही.

(३) मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची?

(४) चढेल तो पडेल.

**प्र.२९. अधोरेखित प्रत्यय ओळखा.**

**मुलांनो, तुमची कमाल आहे.**

(१) द्वितीया व चतुर्थी (२) षष्ठी व पंचमी (३) सप्तमी व संबोधन (४) षष्ठी व संबोधन

**प्र.३०. नाम नसलेला शब्द ओळखा.**

(१) विस्तव (२) चूल (३) उजळ (४) बर्फ

**प्र.३१. योग्य जोडी ओळखा.**

(१) कासव–कासव (२) घोडी–घोड्या (३) वेल–वेला (४) वृक्ष–वृक्षे

**प्र.३२. उपसर्गघटित शब्द ओळखा.**

(१) लढाऊ (२) आपुलकी (३) आस्थेवाईक (४) पराजय

**प्र.३३. सप्तमी विभक्तीचे प्रत्यय ओळखा.**

(१) नो (२) त, ई, आ (३) स, ला, ना, ते (४) चा, ची, चे

**प्र.३४. क्रियाविशेषण ओळखा.**

(१) गरागरा (२) खुळखुळा (३) मोहक (४) मारामार

**प्र.३५. चुकीचे अनेकवचन ओळखा.**

(१) महिला-महिला (२) वाघ-वाघीण (३) पुरुष-पुरुष (४) ग्रह-ग्रह

**पुढील उतारा वाचून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (प्रश्न-क्रमांक ३६ ते ३८)**

आजचे विद्यार्थी जुन्या काळच्या विद्यार्थ्यांपेक्षा अनेक बाबतीत श्रेष्ठ आहेत. तसे ते असावेत, हे निसर्गक्रमाला धरूनच आहे. माझी अशी श्रद्धा आहे की, प्रत्येक पुढची पिढी आधीच्यापेक्षा अधिक शहाणी, अधिक चौकस, अधिक बहुश्रुत आणि बुद्धीने अधिक श्रेष्ठ असणारच. तसे झाले नाही तर इतिहासाला काही अर्थच उरणार नाही. विसाव्या शतकाच्या आरंभकाळाच्या विद्यार्थ्यांपेक्षा एकविसाव्या शतकातले विद्यार्थी अधिक बुद्धिमान, कार्यक्षम आहेत. याबद्दल मला शंकाच वाटत नाही. हे सांगताना स्तुतीची फुंकर घालून तुमच्या अंगचा दोष मला दाखवायचा आहे. 'सत्यं ब्रुयात् प्रियं ब्रुयात' या वचनानुसार मी आतापर्यंत बोललो. आता एक अप्रिय सत्य मला सांगायचे आहे. तुमच्या अंगच्या एका दोषाकडे मला तुमचे लक्ष वेधायचे आहे. त्या दोषाचे नीट संशोधन करून तुम्ही तो नष्ट केला पाहिजे. तो असा की, स्वत:च्या हक्कासंबंधी तुमच्या अंगी फाजिल जागृती निर्माण झाली आहे. त्या प्रमाणात तुम्ही स्वत:ची जबाबदारी मात्र ओळखत नाही किंवा दुसऱ्याच्या हक्काबद्दल आदर बाळगत नाही.

**प्र.३६. 'चौकस' या शब्दाचा योग्य अर्थ ओळखा.**

(१) जिज्ञासू (२) आगाऊ (३) भांडखोर (४) अहंमन्य

**प्र.३७. 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रुयात' या ओळीचा योग्य अथ ओळखा.**

(१) खरे बोलावे. (२) आवडणारे बोलावे.

(३) खोटे बोलू नये. (४) आवडेल असेच खरे बोलावे.

**प्र.३८. बहुश्रुत म्हणजे काय?**

(१) तिखट कानाचे (२) खूप माहिती असलेले

(३) फारसे ज्ञान नसलेले (४) न ऐकणारे

**प्र.३९. 'पृथिवीचे प्रेमगीत ही कुसुमाग्रजांची गाजलेली कविता.' हे वाक्य लेखननियमानुसार होण्यासाठी त्यात कोणता बदल करावयास हवा?**

(१) पृथिवीचे - पृथ्वीचे (२) पृथिवीचे - प्रुथिवीचे

(३) प्रेमगीत - प्रेमगित (४) कुसुमाग्रजांची - कुसुमार्गजांची

**प्र.४०. क्रियापदाचे योग्य रूप ओळखा.**

(१) हशीन (२) हसीन (३) हसेन (४) हाशीन

**प्र.४१. 'खग' शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.**

(१) लेकरू (२) पाखरू (३) कोकरू (४) वासरू

**प्र.४२. तद्‌भव शब्द ओळखा.**

(१) चंद्रमा (२) नीलिमा (३) घास (४) मांस

**प्र.४३. पुढीलपैकी कोणते उदाहरण मध्यमपदलोपी समासाचे नाही?**

(१) नारळीभात (२) गुळपोळी (३) डाळवांगे (४) वडापाव

**प्र.४४. 'नाश होणे' या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.**

(१) रसातळाला जाणे (२) पिट्टा पाडणे

(३) पारा चढणे (४) डोळे उघडणे

**प्र.४५. मराठी नवकवितेचे जनक कोणाला म्हटले जाते?**

(१) केशवसुत (२) नारायण सुर्वे (३) बा. सी. मर्ढेकर (४) मंगेश पाडगांवकर

**प्र.४६. तत्सम् नसलेला शब्द ओळखा.**

(१) ओठ (२) काक (३) पीक (४) व्याघ्र

**प्र.४७. योग्य विरुद्धार्थी जोडी ओळखा.**

(१) बाधित X अबाधित (२) शापित X सुप्त

(३) जागृत X सुश्रूत (४) असुर X राक्षस

**प्र.४८. पुढील सामासिक शब्दातून समाहार द्वंद्व समास ओळखा.**

(१) मीठपीठ (२) पीतांबर (३) दशकुमार (४) महापुरुष

**प्र.४९. 'करावे तसे भरावे' या म्हणीचा योग्य अर्थ ओळखा.**

(१) जेवढे सांडले आहे तेवढे भरावेच लागेल.

(२) बऱ्यावाईट कृत्यानुसार बरेवाईट परिणाम भोगावे लागतात.

(३) कोणाचे नुकसान केले तर भरपाई करून द्यावी लागते.

(४) काही न करणाऱ्याला शिक्षा भोगावी लागत नाही.

**प्र.५०. 'एकेक पान गळावया' या लघुकादंबरीच्या लेखिका कोण?**

(१) गौरी देशपांडे (२) इरावती कर्वे (३) जाई निंबकर (४) शकुंतला परांजपे

**In the following passage there are blanks each of which has been numbera (4) The suitable word for the blank has been mentioned against the number. Choose the appropriate word in the context of the passage to fill in the blanks. (Q. No. 51 to 55)**

Ancestors and dead relations were believed to punish their living 51 for sins, both of commission and 52. The ancestors were the guardians of 53 societys morality and they chastised those 54 failed in their duty. The explanation 55 heard was. He told lies about the riches and the ancestors killed him.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.५१. | (१) people | (२) decendants | (३) acquaintances | (४) friends |
| प्र.५२. | (१) remission | (२) permission | (३) omission | (४) mission |
| प्र.५३. | (१) a | (२) the | (३) any | (४) some |
| प्र.५४. | (१) which | (२) what | (३) have | (४) who |
| प्र.५५. | (१) often | (२) always | (३) inevitably | (४) seldom |

प्र.५६. **Choose the appropriate alternative to fill in the blank.**

**Who wishes to take ...... walk with me?**

(१) the (२) a (३) an (४) No article

प्र.५७. **The young one of a dog is a puppy. The young one of a butterfly is ......**

(१) Cockerel (२) Kitten (३) Leveret (४) Caterpillar

प्र.५८. **Name the underlined clause in the following sentence.**

**This is the house <u>that Sudhir built</u>.**

(१) Noun Clause (२) Adjective Clause

(३) Adverb Clause of Place (४) Adverb Clause of Reason

प्र.५९. **Choose the correct Wh-question for the following sentence to get the underlined part as an answer.**

**Yamunotri is <u>only 13 km</u> from Hanumanchatti.**

(१) How far is Yamunotri from Hanumanchatti?

(२) How far Yamunotri is from Hanumanchtti.

(३) How far Yamunotri from Hanumanchatti is?

(४) How away Yamunotri is from Hanumanchtti.

प्र.६०. **The diminutive of the book is a booklet. The diminutive of a isle is ......**

(१) icicle (२) islet (३) island (४) hillock

प्र.६१. **Choose the correct alternative to fill in the blank.**

**The fact ...... I told my father was incredible to him.**

(१) which (२) who (३) what (४) how

प्र.६२. **Choose the one which best expresses the meaning of the given word : Baulk**

(१) Identify (२) Encourage (३) Verify (४) Prevent

प्र.६३. **Choose the correct use of Unless in the given sentence.**

**If you are brave, you will not fear.**

(१) Unless you are brave, you will not fear.

(२) If you are brave unless you will not fear.

(३) Unless you are brave, you will fear.

(४) If unless you are brave, you will not fear.

प्र.६४. **The cry of a dog is bark. The cry of a cattle is ......**

(१) gibber (२) screech (३) crinkle (४) low

प्र.६५. **Identify the Figure of Speech in the following line:**

**The valley play hide and seek.**

(१) Alliteration (२) Metaphor (३) Personification (४) Apostrophe

प्र.६६. **Choose the appropriate conjunction to fill in the blank :**

**Live well ...... you may die well.**

(१) so that (२) so (३) though (४) if

प्र.६७. **Choose the correctly Spelt word from the following :**

(१) Fasist (२) Facist (३) Facict (४) Fascist

प्र.६८. **Name the Part of Speech of the underlined word :**

**I will watch <u>while</u> you sleep.**

(१) Adverb (२) Preposition (३) Adjective (४) Conjunction

प्र.६९. **Choose the correct Question Tag for the following sentence :**

**I shall not forget your kindness.**

(१) Shall I? (२) Should I? (३) Shalln't I? (४) Shan't I?

प्र.७०. **Choose the one which best expresses the meaning of the given idiom:**

**Pin-money**

(१) Bribery (२) Money paid for compensation

(३) Alimony (४) Allowance made to a lady for her expeness

प्र.७१. **Choose the correct Rhetorical question for the following sentence : Happiness cant be bought with cash.**

(१) Can happiness be not bought with cash?

(२) Can happiness not be bought with cash?

(३) Can happiness be bought with cash?

(४) Both (1) and (2)

प्र.७२. **Choose the correct Assertive sentence for the following sentence :**

**What would not give to see you happy!**

(१) I would give anything to see you happy.

(२) I would give nothing to see you happy.

(३) I would not give everything to see you happy.

(४) I would not give anything to see you happy.

प्र.७३. **The phobia about air is aerophobia . The phobia about time is ......**

(१) Chronophobia (२) Cacophobia (३) Catrophobia (४) Cynophobia

**प्र.७४. The cry of a duck is quack. The cry of a horse is ......**

(१) squeal (२) roar (३) bleat (४) neigh

**प्र.७५. Choose the Feminine Gender of Bachelor**

(१) Girl (२) Spinster (३) Nun (४) Sister

**प्र.७६. Choose the correct Question Tag for the following:**

**We talk of women harassment.**

(१) don't we? (२) do we? (३) did we? (४) didn't we?

**प्र.७७. Choose the correct alternative to fill in the blank.**

**Avinash ...... a strange noise.**

(१) hear (२) hears

(३) is hearing (४) have been hearing

**प्र.७८. Choose the grammatically correct alternative from the following.**

(१) My sister is the poet and the philosopher.

(२) My sister is a poet and the philosopher.

(३) My sister is a poet and a philosopher.

(४) My sister is a poet and philosopher.

**प्र.७९. Choose the correct Preposition to fill in the blank.**

**Sudhir rescued the child ...... danger.**

(१) from (२) to (३) for (४) of

**प्र.८०. The young one of a dog is a puppy. The young one of a deer is ......**

(१) kid (२) calf (३) fawn (४) foal

**प्र.८१. Choose the appropriate alternative to fill in the blank.**

**If you went away now, we ...... you.**

(१) missed (२) will miss

(३) would miss (४) would have missed

**प्र.८२. Choose the correct Indirect Speech for the following sentence.**

**The Prince said, "It gives me great pleasure to be here this evening."**

(१) The Prince said that it gives him great pleasure to be there that evening.

(२) The prince said that it has given him great pleasure to be there that evening.

(३) The Prince said that it gave him great pleasure to be there that evening.

(४) The Prince said that it give him great pleasure to be there that evening.

**प्र.८३. Find out which part of the sentence has an error:**

**<u>Twenty miles</u> / <u>are a long way</u> / <u>to walk</u> / <u>No error</u>.**

(१) A (२) B (३) C (४) D

**प्र.८४. Choose the appropriate alternative to fill in the blank.**

**Where there is ...... will, there is ...... way.**

(१) No article, a (२) a, a (३) No article, the (४) the, the

**प्र.८५. Choose the correct use of 'Not only ...... But also' in the following sentence.**

**They danced to the rhythm of Dholaks and Ghoongrus.**

(१) They not only danced to the rhythm of Dholaks but also Ghoongrus.

(२) Not only they danced to the rhythm of Dholaks but also Ghoongrus.

(३) They danced to the rhythm of not only Dholaks but also Ghoongrus.

(४) None of the above.

**प्र.८६. Choose the correct alternative for the following expression:**

**A place for dogs.**

(१) Stable (२) Hive (३) Archives (४) Kennel

**प्र.८७. Choose the correct form of pronoun to fill in the blank.**

**Ram and ...... were present.**

(१) me (२) I (३) my (४) mine

**प्र.८८. Choose the correct alternative for the following expression.**

**Teaching with the aid of pictures and models.**

(१) Iconography (२) Laxicography (३) Chromatics (४) Iconology

**प्र.८९. Choose the correct Compound sentence for the following sentence:**

**He must work very hard to make up for the lost time.**

(१) He must work very hard that to make up for the lost time.

(२) He must work so hard that he could make up for the lost time.

(३) He must work very hard or make up for the lost time.

(४) He must work very hard and make up for the lost time.

**प्र.९०. Choose the correct alternative to fill in the blank.**

**He ...... to play cricket before his marriage.**

(१) is used (२) was used (३) used (४) will be used

प्र.९१. **Choose the word nearest in meaning to the underlined word:**
**Would you please rectify the mistake?**

(१) correct (२) clarify (३) condone (४) regularise

प्र.९२. **Choose the correct alternative to fill in the blank:**
**The prisoner was released on ..... for good behaviour.**

(१) probation (२) bail (३) parole (४) guarantee

प्र.९३. **Choose the one which best expresses the following sentence in Passive Voice :**
**Piu promised me a present.**

(१) A present is promised me by Piu. (२) A present is promised to me by Piu.

(३) A present was promised me by Piu. (४) A present was promised to me by Piu.

प्र.९४. **Identify the Tense of the given sentence:**
**Many interesting theories will have been put forward.**

(१) Simple Future Tense (२) Future Perfect Tense

(३) Future Perfect Continuous Tense (४) None of the above

प्र.९५. **Choose the appropriate Preposition in the following sentence:**
**I am fired ...... walking.**

(१) of (२) for (३) about (४) to

**Read the following passage and answer the questions by selecting the appropriate alternative: (Q.No. 96 to 100)**

Bansilal's train was late and it reached Bombay a little after midnight. It was his first visit to the city, and he didn't know where to go. He thought he would go to a choultry where he would not have to pay rent, but he did not know how to find one at that hour. He asked a porter to get him a cheap room. The porter asked him for three rupees to take him to one. But Bansilal waved him away and walked out of the station. He wandered through the streets and asked a number of people, but could not find a room cheap enough for him.

He sat down on a park bench to think of what he should do next. He was very tired and fell asleep on the bench. He woke up the next morning, stiff in every limb; but he smiled when he realised that it was the cheapest nights lodging that he had ever had.

प्र.९६. **Bansilal could not get any acommodation for the night as:**

(१) all the hotels in the city were closed.

(२) all the hotel rooms were booked.

(३) the hotels were too expensive for him to afford.

(४) he wanted to spend the night in the open.

**प्र.९७. The night in the open ......**

(१) refreshed Bansilal.
(२) gave him aches all over his body.
(३) made his limbs stronger.
(४) did not affect him at all.

**प्र.९८. In the passage, the word choultry should mean ......**

(१) an expensive hotel.
(२) a highway hotel.
(३) a roadside eatery.
(४) a free resting place.

**प्र.९९. From the passage, Bansilal emerges as......**

(१) a thrifty person.
(२) an extravagant spender.
(३) an adventurous person.
(४) a fun loving person.

**प्र.१००. The porter refused to help Bansilal because ......**

(१) he was rude to the porter.
(२) he had no previous acquaintance with the porter.
(३) he spoke a language which the porter could not understand.
(४) he refused to pay the porter any tip.

**मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी क्रमाने येणारे योग्य पद ओळखा.**

**प्र.१०१. AY, WC, FT, PJ,?**

(१) OK (२) KO (३) NL (४) UE

**प्र.१०२. १०००, ९०३, ८१४, ७३१,?**

(१) ६४२ (२) ६६६ (३) ६३६ (४) ६५२

**प्र.१०४. B, D, H, N,?**

(१) V (२) U (३) T (४) Y

**प्र.१०५. २४, ४८,?, ९६, १२०, १४४**

(१) ८४ (२) ७२ (३) ६० (४) ७६

**संख्यामालिकेतील चुकीचे पद ओळखा: (प्रश्नक्रमांक १०६ व १०७)**

**प्र.१०६. ४०, ३९, १३, १२, ५, ३, १**

(१) १३ (२) ५ (३) ६ (४) १२

**प्र.१०७. ९, २५, ३६, ८१, १२१, १६९**

(१) ३६ (२) ८१ (३) १२१ (४) २५

**प्र.१०८. खाली दिलेल्या गटाशी जुळणारे पद पर्यायांतून निवडा. कांता, जाया, भार्या, दारा,**

(१) जाया (२) काया (३) माया (४) भर्ता

**गटात न बसणारे पद ओळखा. (प्रश्न क्रमांक १०९ ते ११५)**

प्र.१०९. (१) नळ (२) कळ (३) झळ (४) भळ

प्र.११०. (१) ८५३ (२) ७६१ (३) ८६७ (४) ९४५

प्र.१११. (१) BD (२) HR (३) EJ (४) GN

प्र.११३. (१) $\frac{18}{24}$ (२) $\frac{27}{36}$ (३) $\frac{21}{28}$ (४) $\frac{12}{20}$

प्र.११४. (१) G (२) R (३) K (४) W

**खालील मनोऱ्याचे निरीक्षण करून त्याखालील प्रश्नांची योग्य उत्तरे निवडा. (प्रश्न क्रमांक ११६ व ११७)**

११

१२ १३

१४ १५ १६

१७ १८ १९ २०

२१ २२ २३ २४ २५

२६ २७ २८ २९ ३० ३१

प्र.११६. २३, १८, २२, १४ : २३, १९, २४, २० : : २८, २२, २७, १७ :?


(१) २४, २९, ३०, २० (२) २९, २४, ३०, २०

(३) २०, ३०, २४, २९ (४) २९, १९, ३०, २५

प्र.११७. १२, २८ : २२, २६ : : १३, २९ :?

(१) २४, ३० (२) ३१, २४ (३) २५, २४ (४) २४, ३१०

**खालील घन ठोकळ्यावर ४ ते ९ पर्यंतचे अंक लिहून विविध बाजूंनी आकृतीत दाखवले आहे त्यावरून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**




प्र.११८. 9 अंकासमोरील पृष्ठावर कोणता अंक आहे?

(१) 5 (२) 7 (३) 4 (४) 8


प्र.११९. 5 च्या समोरील पृष्ठावर कोणता अंक आहे?

(१) 7 (२) 4 (३) 6 (४) 8

प्र.१२०. ८ ऑगस्ट, २००८ रोजी शुक्रवार असल्यास ९ सप्टेंबर, २००९ रोजी कोणता वार असेल?

(१) रविवार (२) बुधवार (३) गुरुवार (४) शुक्रवार

प्र.१२१. खालील आकृतीत जास्तीत जास्त किती चौकोन तयार होतील?



(१) ५ (२) ६

(३) ४ (४) ३

एका सांकेतिक भाषेत चरण – ५२३, मकर – ६३७, चटक – ६२४, तर खालील प्रश्न सोडवा. (प्रश्नक्रमांक १२२ व १२३)

प्र.१२२. चटमट शब्द कसा लिहिता येईल?

(१) ४३४७ (२) ४४७५ (३) ५२६२ (४) ४२४७

प्र.१२३. ७४३ या अंकापासून तयार होणारा शब्द कोणता?

(१) मगर (२) मटर (३) गरम (४) नरम

खाली दिलेल्या अंकमालेचे निरीक्षण करून उत्तरे द्या. (प्रश्नक्रमांक १२४ व १२५)

४ ३ ६ ७ ५ ४ ३ ७ ४ ४ ५ २ ७ ३ ७ ४ २

प्र.१२४. वरील अंकमालेत लगतच्या दोन अंकांची बेरीज ९ येते, असे किती वेळा झाले आहे?

(१) चार (२) दोन (३) पाच (४) तीन

प्र.१२५. वरील अंकमालेत ७ नंतर लगेचच ४ व ७ पूर्वी लगेचच ३ असे किती वेळा झाले आहे?

(१) तीन (२) एक (३) दोन (४) चार

खालील प्रत्येक प्रश्नात पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी जसा संबंध आहे, तसाच संबंध तिसऱ्या पदाचा चौथ्या पदाशी आहे, तो संबंध ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा योग्य पर्याय निवडा. (प्रश्न–क्रमांक १२६ ते १३२)

प्र.१२६. तीक्ष्ण : बोथट : : ? : अल्लड

(१) सशक्त (२) थोरला (३) पोक्त (४) भाबडा

प्र.१२७. ३ : ३६ : : ४ : ?

(१) १३ (२) ८० (३) ६५ (४) ७२

प्र.१२८. P : D : : Y : ?

(१) L (२) F (३) H (४) E

प्र.१३०. वसंत : ग्रीष्म : : वर्षा : ?

(१) हेमंत (२) शिशिर (३) वसंत (४) शरद

प्र.१३१. ३४ : ६४ : : ५३ : ?

(१) ८१ (२) १००० (३) ६४ (४) १००

प्र.१३२. **BW : ET :: GR : ?**

(१) IP (२) JO (३) JP (४) IO

**खालील लयबद्ध मांडणीचा अभ्यास करून प्रश्नचिन्हाच्या जागी येणाऱ्या पर्यायाची निवड करा (प्रश्नक्रमांक १३३ व १३४)**

प्र.१३५. **प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या निवडा.**

| | | |
|---|---|---|
| 5 | 96 | 10 |
| 60 | 209 | ? |
| 19 | 145 | 6 |

(१) 35 (२) 45 (३) 27 (४) 51

प्र.१३६. **राम व राज एकमेकांच्या पाठीला पाठ लावून उभे आहेत, जर राजच्या उजव्या बाजूला आग्नेय दिशा असेल, तर रामच्या समोरची दिशा कोणती?**

(१) आग्नेय (२) नैर्ऋत्य (३) वायव्य (४) ईशान्य


प्र.१३७. **२००९ चा वर्षारंभ शनिवारने झाला असल्यास, २०१० चा नाताळ कोणत्या वारी येईल?**

(१) मंगळवार (२) गुरुवार (३) सोमवार (४) रविवार

**खालील वेनाकृतीचे निरीक्षण करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे सोडवा.**

**(प्रश्नक्रमांक १४१ व १४२)**

सूचना : चौकोनात खो-खो, त्रिकोणात क्रिकेट व वर्तुळात कबड्डी खेळणारे खेळाडू आहेत, तर :




प्र.१४१. **कबड्डीपेक्षा खो-खोचे खेळाडू कितीने कमी आहेत?**

(१) १३ (२) २० (३) ११ (४) यांपैकी नाही

प्र.१४२. **कमाल दोन खेळ खेळणारे खेळाडू किती आहेत?**

(१) २१ (२) २८ (३) २३ (४) २

प्र.१४३. **सौरभने शीर्षासन केलेले होते. तो सूर्यास्त पाहत होता, तर त्याच्या उजव्या बाजूची दिशा कोणती?**

(१) पूर्व (२) दक्षिण (३) उत्तर (४) पश्चिम

प्र.१४४. खालील आकृतीतील संख्या मांडणीचे सूत्र ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य उत्तराचा पर्याय निवडा.

(12 | 41 | 13) (24 | 34 | 25) (40 | 54 | 41) (60 | ? | 61)

(१) ३८ (२) ६१ (३) ७२ (४) ५८

प्र.१४८. एका रांगेत पहिल्या मुलीनंतर एक मुलगा, दुसऱ्या मुलीनंतर दोन मुले, तिसऱ्या मुलीनंतर तीन मुले यांप्रमाणे एकूण ५४ मुले–मुली उभ्या आहेत, तर त्या रांगेमध्ये एकूण किती मुले उभी आहेत?

(१) ३५ (२) ३९ (३) ४५ (४) ४९

प्र.१४९. क्रिकेटचा सामना माध्यान्हपूर्व ८ वा. ४५ मिनिटांनी सुरू झाला व माध्यान्होतर ४ वा. ३५ मिनिटांनी संपला, तर सामना किती वेळ चालला?

(१) ४ ता. १० मि. (२) २ ता. १० मि.

(३) ८ ता. ५० मि. (४) ७ ता. ५० मि.

प्र.१५०. ४ वाजून ८$x$ मि. व ६ वाजायला ७$x$ कमी. या दोन्ही वेळा एकच असतील, तर ती वेळ कोणती?

(१) ४ वा ५६ मि. (२) ५ वा. १४ मि.

(३) ५ वा. ०४ मि. (४) ५ वा. ५६ मि.

प्र.१५१. पाकिस्तानची संकल्पना कोणी मांडली?

(१) डॉ. मुहम्मद इक्बाल (२) चौधरी रहमत अली

(३) बॅरिस्टर महम्मद अली जीना (४) लियाकत अली खान

प्र.१५२. पूर्वीच्या काळी वापरले जाणारे चांदीचे नाणे कोणते?

(१) पद्मटंक (२) होन (३) टंका (४) मोहर

प्र.१५३. दक्षिण अशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेमध्ये (सार्क) समाविष्ट असलेला देश कोणता?

(१) इंडोनेशिया (२) म्यानमार (३) मालदीव (४) चीन

प्र.१५४. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात लहान व सर्वात मोठ्या असलेल्या जिल्ह्यांच्या जोडीचा पर्याय कोणता?

(१) मुंबई उपनगर, अहमदनगर (२) मुंबई, अहमदनगर

(३) मुंबई, पुणे (४) मुंबई उपनगर, नाशिक

प्र.१५५. पदार्थात असलेल्या टार्टारिक आम्लाचा उपयोग प्रामुख्याने कशासाठी होईल?

(१) अन्नाची नासाडी टाळणे. (२) अन्नाचे विघटन करणे.

(३) अन्न रुचकर बनविणे. (४) अन्नातील भेसळ ओळखणे.

प्र.१५६. भारतीय शेळींपैकी सर्वाधिक दूध देणारी शेळी कोणती?

(१) ब्लॅक बेंगॉल (२) जमुनापारी (३) संगमनेरी (४) बिकानेरी

**प्र.१५७. तत्त्वज्ञानाबरोबरच जीवनातील अडचणी, औषधी वनस्पती याविषयीची माहिती वैदिक काळातील कोणत्या ग्रंथात समाविष्ट आहे?**

(१) यजुर्वेद (२) अथर्ववेद (३) सामवेद (४) ऋग्वेद

**प्र.१५८. खालील पर्यायांपैकी 'कुस्ती' या क्रीडाप्रकाराशी संबंधित राष्ट्रीय खेळाडू कोण?**

(१) सुशीलकुमार (२) विजेंद्रकुमार (३) मनोजकुमार (४) विजयकुमार

**प्र.१५९. भारतातील पहिली मोनोरेल कोणत्या दोन ठिकाणाच्या दरम्यान सुरू झाली?**

(१) करोलबाग ते न्यू दिल्ली (२) पाचपाखडी ते मानखुर्द

(३) वडाळा ते चेंबूर (४) अंधेरी ते मुंब्रा

**प्र.१६०. भारतात १९५० पूर्वी स्वराज्यदिन म्हणून कोणता दिवस साजरा केला जात असे?**

(१) १५ ऑगस्ट (२) ९ ऑगस्ट (३) २६ नोव्हेंबर (४) २६ जानेवारी

**प्र.१६१. खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणते/कोणती?**

**(अ) ब्रम्हपुत्रा नदीचा उगम तिबेटमध्ये होतो.**

**(ब) अरुणाचल प्रदेशामध्ये ब्रम्हपुत्रा ही नदी दिहांग या नावाने ओळखली जाते.**

(१) फक्त अ (२) फक्त ब

(३) दोन्ही अ आणि ब (४) अ आणि ब दोन्ही नाही

**प्र.१६२. महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामाजिक वनीकरणाचा उपक्रम बहुतेक शाळांत कोणत्या माध्यमातून राबविला जात आहे?**

(१) देवराई (२) वनराई (३) हरितसेना (४) वनशेती

**प्र.१६३. भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्यावेळी ब्रिटनचे पंतप्रधान कोण होते?**

(१) विस्टंन चर्चिल (२) सर पॅथिक लॉरेन्स (३) क्लेमेंट ॲटली (४) लॉर्ड चेंबरलेन

**प्र.१६४. पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ कोणत्या पक्षाशी संबंधित आहेत?**

(१) पाकिस्तान पीपल्स पार्टी (२) पाकिस्तान मुस्लिम लीग

(३) पाकिस्तान अवामी लीग (४) तेहरीक-ए-इन्साफ पार्टी

**प्र.१६५. पाचक रसामुळे प्रथिने, पिष्टमय पदार्थांचे विघटन व अन्न आम्लीय करण्याचे कार्य मानवी शरीरातील कोणत्या इंद्रियात घडते?**

(१) जठर (२) लहान आतडे (३) मोठे आतडे (४) वृक्क

**प्र.१६६. भोपाळ येथे खालील पर्यायांपैकी कोणती संस्था आहे?**

(१) राष्ट्रीय वनव्यवस्थापन संस्था (२) भारतीय हवामानशास्त्र संस्था

(३) भारतीय वनसंशोधन संस्था (४) राष्ट्रीय पर्यावरण संवर्धन संस्था

**प्र.१६७. खालील पर्यायांपैकी सूर्यमालेतील बहिर्ग्रह कोणता?**

(१) पृथ्वी (२) गुरू (३) शुक्र (४) मंगळ

**प्र.१६८. १९४३ साली आझाद हिंद सेनेने जिंकलेल्या अंदमान व निकोबार या बेटांचे सुभाषचंद्र बोस यांनी अनुक्रमे कोणते नामकरण केले होते?**

(१) स्वराज्य, शहीद (२) विजय, आझाद (३) आझाद, विजय (४) शहीद, स्वराज्य

**प्र.१६९. उपराष्ट्रपती व राष्ट्रपती ही दोन्ही पदे भूषविणारी व्यक्ती खालील पर्यायांपैकी कोणती?**

(१) डॉ. नीलम संजीव रेड्डी (२) चक्रवर्ती राजगोपालचारी
(३) ग्यानी झैलसिंग (४) डॉ. शंकरदयाळ शर्मा

**प्र.१७०. पश्चिम घाट प्रदूषण मुक्त करण्यासाठी नेमलेल्या समितीचे प्रमुख कोण होते?**

(१) डॉ. माधवराव चितळे (२) माधवराव गाडगीळ
(३) आ. ह. साळुंखे (४) नरेंद्र साळुंखे

**प्र.१७१. राजू, दीपक, रूपाली आणि स्वाती यांचे रक्तगट अनुक्रमे A, B, AB आणि O असे आहेत, यावरून स्वाती वरीलपैकी कोणाला रक्तदान करू शकते?**

(१) फक्त दीपक (२) फक्त स्वाती
(३) फक्त रूपाली (४) दीपक, राजू आणि रूपाली या तिघांना

**प्र.१७२. दिनेशचे वय १७ वर्षे आहे, तर तो आणखी कमीत कमी किती वर्षांनी ग्रामपंचायतीच्या सदस्यत्वासाठी निवडणूक लढवू शकतो?**

(१) १ वर्षे (२) ८ वर्षे (३) ४ वर्षे (४) ११ वर्षे

**प्र.१७३. २०१३ ची पाचवी ब्रिक्स परिषद कोठे पार पडली?**

(१) डर्बन (२) सन्‌सिटी (३) ब्राझीलिया (४) मॉस्को

**प्र.१७४. संघटना आणि संस्थापक/नेते यांच्या अयोग्य जोडीचा पर्याय कोणता?**

(१) आझाद दस्ता – भाई कोतवाल (२) तुफान सेना – जनरल आवारी
(३) आझाद रेडिओ – विठ्ठल जव्हेरी (४) आझाद सेना – क्रांतिसिंह नाना पाटील

**प्र.१७५. भारतात SEZ (सेझ) ची स्थापना कोणत्या देशाच्या धर्तीवर करण्यात आली?**

(१) जपान (२) चीन (३) रशिया (४) अमेरिका

**प्र.१७६. ब जीवनसत्वास काय म्हणतात?**

(१) थायमिन (२) अ‍ॅस्कोर्बिक आम्ल (३) नायसिन (४) बेन्झॉइक आम्ल

**प्र.१७७. सध्या महाराष्ट्रात असलेले कोणते जिल्हे १९४७ साली स्वतंत्र भारतात समाविष्ट झालेले नव्हते.**
**(अ) परभणी (ब) औरंगाबाद (क) उस्मानाबाद**

(१) फक्त अ आणि ब (२) फक्त ब आणि क
(३) फक्त अ आणि क (४) तिन्ही अ, ब आणि क

**प्र.१७८. 'मायक्रोमीटर' हे परिमाण कशाच्या मापनासाठी वापरले जाते?**

(१) समुद्राची खोली (२) वाऱ्याचा वेग
(३) द्रव पदार्थाची घनता (४) पेशींचे आकारमान

**प्र.१७९. खालील पर्यायांपैकी उत्तर अमेरिका खंडातील पर्वत कोणता?**

(१) आल्प्स (२) रॉकी (३) ॲटलस (४) कुनलुन

**प्र.१८०. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २००३ साली कोणत्या बँकेला बँकिंग परवाना दिला?**

(१) आय.सी.आय.सी.आय.बँक (२) आय.डी.बी.आय.बँक

(३) येस् बँक (४) एच.डी.एफ.सी.बँक

**प्र.१८१. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात १९३२ साली झालेल्या पुणे करारात काय ठरविण्यात आले?**

(१) दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ जाहीर करणे.

(२) दलितांना विधिमंडळात राखीव जागा ठेवणे.

(३) रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचा जातीय निवाडा मान्य करणे.

(४) दलितांसाठीच्या स्वतंत्र मतदार संघासाठी एकत्रित लढा देणे.

**प्र.१८२. भारत सरकारकडून दिला जाणारा भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार खालील पर्यायांपैकी कोणाला प्रदान करण्यात आलेला आहे?**

(१) सरोजिनी नायडू (२) सावित्रीबाई फुले

(३) ॲनी बेझंट (४) अरुणा असफअली

**प्र.१८३. महाराष्ट्राच्या नागपूर या प्रशासकीय विभागात नसलेला जिल्हा कोणता?**

(१) वर्धा (२) गोंदिया (३) अकोला (४) चंद्रपूर

**प्र.१८४. 'गोविंदाग्रज' या टोपण नावाने लेखन करणारे कवी कोण?**

(१) विंदा करंदीकर (२) वि. वा. शिरवाडकर

(३) गोविंद बल्लाळ देवल (४) राम गणेश गडकरी

**प्र.१८५. 'आंतरराष्ट्रीय कामगार संघटना' ही कोणत्या प्रमुख संस्थेची संलग्न संस्था आहे?**

(१) UNO (२) UNESCO (३) WTO (४) NATO

**प्र.१८६. भारतीय राज्यघटनेतील कलम २८० कशाशी संबंधित आहे?**

(१) भारतीय नियोजन आयोग (२) भारतीय निवडणूक आयोग

(३) संघ लोकसेवा आयोग (४) भारतीय वित्तआयोग

**प्र.१८७. लाला लजपतराय यांच्याशी संबंधित नसलेली बाब खालील पर्यायांपैकी कोणती?**

(१) दैनिक वंदेमातरम (२) दैनिक पंजाबी

(३) समता वृत्तपत्र (४) इंग्रजी मासिक पिपल

**प्र.१८८. समुद्रावरून जमिनीकडे वाहणारे खारे वारे कोणत्या कारणामुळे वाहतात?**

(१) उष्णतेचे वहन (२) उष्णतेचे प्रारण

(३) उष्णतेचे अभिसरण (४) उष्णतेचे असंक्रमण

**प्र.१८९. महामार्ग चौपदरीकरणातील पूर्व-पश्चिम महामार्गाच्या टोकाशी असणारी शहरे कोणती?**

(१) पोरबंदर – सिल्व्हासा (२) राजकोट – गुवाहाटी

(३) मुंबई – सिल्व्हासा (४) मुंबई – गुवाहाटी

**प्र.१९०. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील सर्वात कमी साक्षर लोकसंख्येचा जिल्हा कोणता?**

(१) नंदुरबार (२) गडचिरोली (३) चंद्रपूर (४) गोंदिया

**प्र.१९१. अशिया खंडातील सर्वात मोठी लोकर बाजारपेठ कोणती?**

(१) बिकानेर (२) काठमांडू (३) काबूल (४) पेशावर

**प्र.१९२. १८५७ पूर्वी कोणत्या जमातीने इंग्रजांविरुद्ध बिहार राज्यात उठाव केला होता?**

(१) संथाळ (२) कोलाम (३) बंडगर (४) गोंड

**प्र.१९३. खालील पर्यायांपैकी भुईकोट किल्ला कोणता?**

(१) खेळणा किल्ला (२) कंजळगड (३) भोरप्या (४) कंधारचा किल्ला

**प्र.१९४. 'लक्षद्वीप' या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी कोणती?**

(१) पोर्टब्लेअर (२) बित्रा (३) कवरती (४) सिल्व्हासा

**प्र.१९५. भारताच्या कोणत्या राज्याला नेपाळची सीमा लागून (संलग्न) नाही?**

(१) उत्तराखंड (२) सिक्कीम (३) आसाम (४) प. बंगाल

**प्र.१९६. जगात फक्त भारतात आढळणारा प्राणी कोणता?**

(१) नीलगाय (२) बारशिंगा (३) चौशिंगा (४) काळवीट

**प्र.१९७. खालील पर्यायांपैकी अयोग्य विधान कोणते?**

(१) पंचायत समितीचा सभापती जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सदस्य नसतो.

(२) गावातील सर्व प्रौढ गावकऱ्यांच्या सभेला ग्रामसभा म्हणतात.

(३) पंचायत समितीचा सचिव गटविकास अधिकारी असतो.

(४) ग्रामसभा बोलविण्याची जबाबदारी सरपंचावर असते.

**प्र.१९८. 'अमरवेल' ही वनस्पती खालील पर्यायांपैकी कोणत्या गटातील आहे?**

(१) मृतोपजिवी (२) बाह्यपरजिवी (३) अंत:परजिवी (४) स्वयंपोषी

**प्र.१९९. भारतीय संसद/महाराष्ट्र राज्यविधि मंडळ यांची सभागृहे आणि त्यातील सदस्यसंख्या यांच्या जोडीचा योग्य पर्याय कोणता?**

(१) महाराष्ट्र विधानसभा – २७८ (२) महाराष्ट्र विधानपरिषद – ८८

(३) लोकसभा – ५४३ (४) राज्यसभा – २५०

**प्र.२००. खाण्याच्या सोड्याचे रासायनिक नाव कोणते?**

(१) सोडिअम हायड्रोजन कार्बोनेट (२) सोडिअम कार्बोनेट

(३) सोडिअम क्लोराइड (४) सोडिअम नायट्रेट

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | (२) | २ | (१) | ३ | (१) | ४ | (४) | ५ | (४) | ६ | (२) | ७ | (२) | ८ | (२) | ९ | (१) | १० | (१) |
| ११ | (१) | १२ | (३) | १३ | (२) | १४ | (४) | १५ | (३) | १६ | (४) | १७ | (१) | १८ | (३) | १९ | (२) | २० | (३) |
| २१ | (२) | २२ | (४) | २३ | (४) | २४ | (१) | २५ | (१) | २६ | (२) | २७ | (३) | २८ | (३) | २९ | (४) | ३० | (३) |
| ३१ | (३) | ३२ | (४) | ३३ | (२) | ३४ | (१) | ३५ | (२) | ३६ | (१) | ३७ | (४) | ३८ | (२) | ३९ | (१) | ४० | (३) |
| ४१ | (२) | ४२ | (३) | ४३ | (४) | ४४ | (१) | ४५ | (३) | ४६ | (१) | ४७ | (१) | ४८ | (१) | ४९ | (२) | ५० | (१) |
| ५१ | (२) | ५२ | (३) | ५३ | (२) | ५४ | (१) | ५५ | (१) | ५६ | (२) | ५७ | (४) | ५८ | (२) | ५९ | (१) | ६० | (२) |
| ६१ | (१) | ६२ | (४) | ६३ | (३) | ६४ | (४) | ६५ | (३) | ६६ | (१) | ६७ | (४) | ६८ | (४) | ६९ | (१) | ७० | (४) |
| ७१ | (३) | ७२ | (१) | ७३ | (३) | ७४ | (४) | ७५ | (२) | ७६ | (१) | ७७ | (२) | ७८ | (४) | ७९ | (१) | ८० | (३) |
| ८१ | (३) | ८२ | (३) | ८३ | (२) | ८४ | (२) | ८५ | (३) | ८६ | (४) | ८७ | (२) | ८८ | (१) | ८९ | (४) | ९० | (३) |
| ९१ | (१) | ९२ | (३) | ९३ | (४) | ९४ | (२) | ९५ | (१) | ९६ | (३) | ९७ | (२) | ९८ | (४) | ९९ | (१) | १०० | (४) |
| १०१ | (१) | १०२ | (४) | १०३ | () | १०४ | (१) | १०५ | (२) | १०६ | (२) | १०७ | (१) | १०८ | (१) | १०९ | (१) | ११० | (३) |
| १११ | (२) | ११३ | (४) | ११४ | (२) | ११६ | (२) | ११७ | (१) | ११८ | (३) | ११९ | (१) | १२० | (२) | १२१ | (१) | १२२ | (४) |
| १२३ | (२) | १२४ | (१) | १२५ | (३) | १२६ | (३) | १२७ | (२) | १२८ | (४) | १३० | (४) | १३१ | (१) | १३२ | (२) | १३५ | (१) |
| १३६ | (२) | १३७ | (३) | १४१ | (३) | १४२ | (१) | १४३ | (२) | १४४ | (१) | १४८ | (३) | १४९ | (४) | १५० | (३) | १५१ | (२) |
| १५२ | (३) | १५३ | (३) | १५४ | (२) | १५५ | (३) | १५६ | (२) | १५७ | (२) | १५८ | (१) | १५९ | (३) | १६० | (४) | १६१ | (३) |
| १६२ | (३) | १६३ | (३) | १६४ | (२) | १६५ | (१) | १६६ | (१) | १६७ | (२) | १६८ | (४) | १६९ | (४) | १७० | (२) | १७१ | (४) |
| १७२ | (३) | १७३ | (१) | १७४ | (२) | १७५ | (२) | १७६ | (३) | १७७ | (४) | १७८ | (४) | १७९ | (२) | १८० | (३) | १८१ | (२) |
| १८२ | (४) | १८३ | (३) | १८४ | (४) | १८५ | (१) | १८६ | (४) | १८७ | (३) | १८८ | (३) | १८९ | (१) | १९० | (१) | १९१ | (१) |
| १९२ | (१) | १९३ | (४) | १९४ | (३) | १९५ | (३) | १९६ | (३) | १९७ | (१) | १९८ | (२) | १९९ | (४) | २०० | (१) | | |